'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 1 Issue. 4
ISSN :2348-7143 (Online)
Oct. - Dec. - 2014

पोतराजाचे पथनाटय एक प्रयोगरुप कलाप्रकार

प्रा. माधव वाघमारे,
अर्जापुर

ग्रामीण समाजामध्ये देवीच्या उपासनेला अनन्यसाधारण असे महत्व असते. बहुजन समाजातील अनेक जातीमध्ये देवीची उपासना केली जाते. त्यापैकी 'मरीआई' ही बहुजन समाजामध्ये विशेषत: पुर्वाश्रमीचा महार आणि मांग जाती मध्ये 'ग्रामदैवत' म्हणुन पुजल्या जाते.

देवी म्हटल की तिला 'भगत' आलाच. 'भगत' हा शब्द 'भक्त' या शब्दाचा अपभ्रंशीत रुप आहे. देवीच्या भक्तामध्ये गोंधळी, भुते, भाराधी, पोतराज, वाघे, भराडी, जोगती आदींचा भरणा आहे. पोतराज हा मरीआईचा भक्त, चांदगडचा वारकरी, पश्चिम महाराष्ट्रात पोतराजालाच 'कडकलक्ष्मी' असंही म्हटलं जात.[1]

ग्रामदैवताचं देउळ हे गाव शिवेवर असत. गावाचे रक्षण करणे हा त्यामागचा उददेश असतो. अर्थात मरीआईचे देवुळ हे गावशिवेवर असते. धुरपतमाय, मरीमाय, पोच्चम्मा अशा वेगवेगळया नावाने वेगवेगळया प्रदेशात संबोधल्या जात असल्या तरी त्या एकच आहेत.[2] या व्यतिरीक्त स्थान महात्मयावरुनही ग्रामदैवत ठरलेले असते. मरीआईच्या कोपामुळे गावावर संकट ओढावले जाते असा लोकसमज आहे. कांजन्या, महामारी, प्लेग, पटकीसारखे रोग तिच्या अवकृपेमुळे होतात असा समज आहे. अशी भयानक उग्र स्वरुपाची देवी असते. या देविचा कोप नाहीसा करण्यासाठी देविच्या उपासकाला म्हणजेच पोतराजाला पाचारण करुन देविचा गाडा गावाबाहेर नेला जातो.

मरीआई उग्र स्वरुपाची असते त्याचप्रमाणे तीचा भक्त पोतराज हा ही उग्र स्वरुपाचा असतो. पोतराज हा शब्द 'द्रविड' भाषेतील पोतराज या शब्दाचा मराठीत अपभ्रंश आहे.[3.] पोतराजाची वेशभुषाही इतर भक्तांपेक्षा अक्राळ विक्राळ अशा स्वरुपाची असते. बलदंड शरीरयष्टी, डोक्याचे केस लांबच लांब असुन ती पाठीवर मोकळी सोडलेली असतात. कमरेच्या वर अंगात कपडाच नसतो. डोळयामध्ये काजळ लावलेले असते. कपाळावरती हळद आणि कुंकवाने मळवट भरलेले असते, तर कमरेला नेसलेल्या कपडयाला चोळीची रंगीबेरंगी खण बांधलेली असतात त्यालाच 'आभरान' असे म्हणतात. या आभरानाबदल पार्थपोळके आपल्या आत्मकथनात असे म्हणतात. 'आभरान' म्हणजे इथल्या व्यवस्थेने पोतराजाला दिलेली राजवस्त्रच सगळया आयुष्याच्या चिंध्या करायला लावणारी, घुंगराची घुंगरमाळ कमरेला बांधलेली असते. पायात घुंगरं असतात. हातात डफंड असतं तर खांदयावर कोरडा त्यालाच 'कडक' असे म्हटल्या जाते व हातामध्ये हिरव्या बांगडया भरल्या जातात. हिरवी वस्त्र, हिरव्या बांगडया हे कृषी संस्कृतीचे सृजनशिलतेचं घोतक मानल्या जातात. याचा अर्थ हे सर्व एका अर्थाने कृषी संस्कृतीशी निगडीत आहे

म्हणुन तर पोतराज मरीआईचा गाडा घेउन शेतात नाचला तर पिकाचं उत्पन्न जास्त हाते असा एक लोकसमज दिसुन येतो.

पोतराज हा पुरुष असुनही त्याचा वेश हा स्त्रिसदृश्य आहे. दक्षिणेतील ग्रामदेवी पतीव्रत्यासाठी किंवा कडक कौमार्यासाठी प्रसिध्द असल्यामुळे त्यांच्या उपासनेत स्त्रियांचे नपुसक पुरुषांचे आणि स्त्रीत्वाचा आभास निर्माण करण्या-या पुरुषांचे प्रस्थ दिसते त्याचे कारणही हेच दिले जाते.[4] असे लोकसाहीत्याचे अभ्यासक रां.ची.ढेरे यांचे म्हणणे आहे.

घरामध्ये सुखशांती लाभावी जन्मलेली मुलं वाचावी रोगराई कमी व्हावी म्हणुन देवीला नवस केला जातो. आणि पहीला मुलगा जन्मल्यानंतर नवस फेडण्यासाठी देविला सोडला जातो त्यालाच "पोतराज" असे म्हणतात. त्यासाठी विशिष्ट प्रकारचा विधी पार पाडावा लागतो. साधारणत:हा महार किंवा मांग जातीतील हे पोतराज असतात.कोल्हापुर जिल्हयातील "दहीवडी" या गावी त्यांचे मुख्य ठाणे आहे. तेथे त्यांची तीन वर्षाला एकदा जत्रा भरली जाते.

पोतराजाचे पथनाटय

पावसाळयाच्या दिवसात म्हणजेच आषाढ महिन्यात पोतराज मंगळवार आणि शुक्रवार पाहुन देविच्या वारीसाठी गावोगाव भटकंतीवर निघतो. मंगळवार आणि शुक्रवार हे देविचे वार असतात पोतराजासोबत त्याची बायको असते. नउवार लुगडं नेसुन डोक्यावर देविचा डोलारा घेउन पाठीवर लहान बाळ बांधलेली असते वाजंत्रीच्या तालावर पोतराजासोबत नाचत असते.

ज्या पध्दतीने मरीआई उग्रस्वरुपाची असते त्याप्रमाणे तिचा भक्त पोतराज हा सुध्दा उग्रस्वरुपाचा असतो तर त्याची वाजंत्री हलगी सुध्दा उग्रच असते. पायातील तोडयांचा आणि कमरेच्या घुंगरमाळांचा व सनई व हलगीच्या आवाजासोबत पोतराज गावात फेरी मारतो आणि देविच्या नावाने आरोळी ठोकतो व देविच्या "वव्या" म्हणतो. असे म्हणत म्हणत तो गावातील मोकळया जागेत पारासमोर,शाळेसमोर,चावडीसमोर जिथे मोकळी जागा असेल तेथे तो आपले पथनाटय सादर करतो.

पथनाटय सादर करण्यामागचा मुळ उदेश धर्मविधी असला तरी त्यामधुन एक विधीनाटय सादर होत असते. त्याची रंगभुमी ही नैसर्गिक स्वरुपाची असते. कसल्याच प्रकारची सजावट नसते. त्याचा प्रेक्षक वर्ग ही अमुकच असा नसतो तर गावातील सर्व जातीधर्मातील अबालवृध्द व्यक्ती असतात. हलगीचा आवाज ऐकला की पोतराज आला म्हणुन सर्व लोक गोळा होत असतात.

पथनाटयामध्ये मरीआईची गाणी म्हणत असतांना त्याला ईतर वाजंत्रयाकडुन मदत मिळत असते.

"आली आली मरीबया हिच कळना अनुभव,
भल्या भल्यांची घेती जीव,

आली आली मरीबया का सुटलासा वारा

दुनिया कापती चळाचळा"[5]

अशा पध्दतीने मरीआईचा महीमा तिची धास्ती व सामर्थ्य व्यक्त होणारे गाणी तो म्हणत असतो. ही गाणी म्हणत असतांना सुरताल लयबध्दपणा असतो.

पोतराजाचे नृत्य हे भयानक अशा प्रकारचे असते. नृत्यामध्ये मुक्तपणा असतो. नृत्यकरीत असतांनाच तो कथनही करीत असतो. देविला प्रसन्न करुन घेण्यासाठी तो वेगवेगळया क्लृप्त्या वापरतो. प्रथमत: देविला गाण्यामधुन विनंती करतो.

उदा. बया दार उघड, बया दार उघड

मरी आई बया, बया दार उघड

लक्ष्मी आई बया, दार उघड.[6]

एवढयाने आई प्रसन्न् हेात नसेल तर तो खांदयावरील कोरडयाने स्वत:ला फटके मारुन घेतो. दंडाला घट्ट दोरी बांधुन दंडामध्ये दाभण खुपसतो व रक्त काढतो. जिभेतुन दाभण आरपार काढतो. अशा भयानक कृत्यातुन देविला प्रसन्न् करतो व देवि प्रसन्न् झाल्याने तर त्याला अवर्णनिय अशा प्रकारचा आनंद होतो व गाणे म्हणतो.

उदा. आई मरीमाता

एकाचे एकविस

पाचाचे पन्नास

वेल मांडवाला जाउ दे

ताक आमरुतात डेर घुमु दे

कपाळाच कंकु, हाताचा चुडा पायातल जोडवं

यसवंत राक लकसीमी.[7]

मग सभोवताली जमलेल्या बायका त्या गाडयामधील देविची पुजा करतात. पुजेसाठी आणलेले नैवदय सुपात ठेवुन पोतराजाला देतात ते सुप घेवुन पोतराज गरगर फिरतो आणि सुप सरळ उभे करतो. त्या सुपातील एकही कण खाली पडु देत नाही. हे करीत असतांना त्याला गती प्राप्त होत असते त्यामुळे दाने खाली पडत नाहीत परंतु भोळया भाबडया प्रेक्षकांना हा देविचा चमत्कार वाटायला लागतो. मंद अशा पायाच्या हालचाली करीत गीत म्हणत, कथन करीत तो भिक्षा मागीत असतो पोतराजाच्या अशा वृतीतुन एक प्रकारच जीवंत नाटय प्रेक्षकांना अनुभवयास मिळत असते.

मरीआईच्या कोपामुळे गावात साथीच्या रोगाची लागण झालेली असते. तेव्हा आईचा गाडा गावाबाहेर नेउन सोडण्यासाठी पोतराजाला पाचारण केले जाते त्या विधिलाच गाव बांधणी असे म्हटल्या

जाते. या गाव बांधणीच्या कार्यक्रमातुनच पोतराजाच्या नृत्य नाटयाचे खरे कलादर्शन अनुभवयास येते. हया विधिच्या वेळेस पोतराज देविच्या ----*म्हणत असतो.

उदा. अरकट मरी परकट मरी, मरीमाता
तुझा रेडा नगरीस घालुन वेढा
येशीच्या दारी, पोतराज सोंगाडा
भरला लिंबानारळान गाडा
निंबाच नेसठा दहीभात शिंपाडानं.[8]

हया धुपाटया म्हणत असतांना त्याला अपार असा आनंद होतो शब्दागनिक त्याच्या चेह-यावर हावभाव उमटत असतात तो हातवारे करीत असतो. आवेशपुर्ण अशा धुपाग्या गात असतो. मरीआईचा जयघोष करीत गाडयाच्या समोर गावाच्या बाहेर जात असतो. तेंव्हा मधुनच पोतराज कभागीव सादर करीत असतो व संपादनी करीत असतो संपादनी करीत असतांना हळुवार पायाचा ठेका आणि संगीत लयबध्दपणे चालु असते. गाणी,कथागीत,धुपाग्या प्रेक्षकांना प्रश्न विचारत त्यांना संवाद साधत असतो अशा अनेक प्रसंगातुन पोतराज आजुबाजुला उभ्या असलेल्या श्रोत्यासमोर जीवंत अशा प्रकारचे नाटय उभा करतो. यामध्ये धुपाग्या, गाणे पोतराज एकटाच म्हणत असला तरी त्या नृत्य, नाटय, संगीत संवादामधुन प्रेक्षकांना एक जिवंत नाटयानुभव येत असतो. त्यामुळे पोतराजाच्या पथनाटयात श्रोता व पोतरात एकरुप होत असतात. हे पथनाटय एक धर्मविधी असले तरी पोतराजाला श्रोत्यांची जाणीव असते त्यामुळे तो त्या विधीला नाटयाला पातळीवर नेत असतो.

'पोतराज' हा हजारो वर्षांपासून अभिजात व समृद्ध अशा पद्धतीची संस्कृती जतन व संवर्धन करीत आलेला आहे. परंतु त्याच्या जीवनाचे मातेरे झालेले असते अंगात घातलेल्या आभरानाप्रमाणेच त्याचे जीवनही चिंध्या झालेले आहे. 'आभरण म्हणजे इथल्या व्यवस्थेने पोतराजाला दिलेली राजवस्त्रच सगळ्या आयुष्याच्या चिंध्या करायला लावणारी'[9] हिंदू समाजात चारवर्ण आहेत त्या वर्णाप्रमाणेच त्या देवता ठरलेल्या आहेत. सोबत अंधश्रद्धा, रूढी, परंपरा ठरलेल्या आहेत. त्यामधूनच पोतराज निर्माण झालेला दिसून येतो. या देवतांचे उपासक हि त्या त्या वर्णातीलच असतील अशी सोय करून ठेव्लेली आहे. लोककला जीवंत ठेवण्यामध्ये बहुजनसमाजातील लोककलावंताचे विशेष असे योगदान आहे. जातीनुसार कलांची आणी कलाकारांची श्रेष्ठता ठरविण्यात आल्यामुळे उच्चप्रभू समजल्या जानाऱ्या संस्कृतीने या कलेची आणि कलाकारांची दखल कधी घेतलीच नाही त्यामुळे आता हि लोककला लयास जात आहे. बाबा आढाव सारख्या समाजसुधारकांनी आपल्या जातीतील पोतराजांची लांब असलेली केस सरळ कापून टाकली आहेत. या समाजातील हा किळसवाना कलाप्रकार नकोसा वाटायला लागला आहे. नवीन पिढी या कलेमध्ये यायला तयार होत नाही, कारण वर्षानुवर्षे त्याचे शोषण आणि अन्याय होत आलेला आहे. नोकरी

किंवा इतर व्यवसायात तो स्वतःला गुंतवतो आहे. या समाजातील लोकामध्ये नवे आत्मभान आलेले आहे. हि अंधश्रद्धेने निर्माण झालेली जीवन उध्वस्त करणारी लोककला नकोशी वाटत आहे. हे परिवर्तन आता दिसून येत आहे.

ज्या कलेचा अविष्कार नव्हे जीवनाविष्कार पोतराज करत होता. जीवनाचा एक अविभाज्य भाग ती कला बनलेली होती त्या कलेवरती उपजीविका पूर्वी होत होती, परंतु आता त्या कलेवर पोट भारत नसल्यानुले ते लोक कलावंत दुसरीकडे वळलेले दिसून येतात. तरी अजूनही एकविसाव्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात देवीचा गाडा गावाबाहेर नेण्याचा विधी साजरा केला जातो विज्ञानानेही हार पत्कारावी अशा प्रकारचा हा प्रकार आहे.

भारतात अजून जगण्याचा प्रश्न संपलेला नाही तर येथील व्यवस्था बदलण्याचे सामर्थ्य या लोकामध्ये कुठून येणार असा प्रश्न पडतो. उमरी तालुक्यातील हुंडा या गावी अजूनही जत्रेच्या वेळी पोतराजालाच सर्व कार्य पार पाडावी लागतात. हे पाहून मन हतबल व्हायला लागते. त्यासाठी सक्षम अश्या प्रकारची व्यवस्था उभारून कलाकारापर्यंत योजना पोहचवाव्या तेव्हा कुठे कलांचे आणि कलाकारांचे भवितव्य उज्वल होईल असे वाटते.

संदर्भ ग्रंथ सूची

१) खंदारे (डॉ) साहेब –लोकसाहित्य शब्द आणि प्रयोग, प्रतिमा प्रकाशन, २०००, प्र.आ.,पृ ७८
२) व्यवहारे (डॉ) शरद –लोकसंस्कृतीचा अंतप्रवाह पृ ७९
३) ढेरे रा.चि. –लोकसाहित्याचे उपासक पृ ७१
४) तत्रेव - पृ-७७
५) मुलाखतीतून
६) तत्रेव
७) तत्रेव
८) तत्रेव
९) मुलाटे (डॉ) वासुदेव (संपा) दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप पृ १६८